# नवजीवन आणि दुर्दैवी

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**नवजीवन आणि दुर्दैवी : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २५०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

## अनुक्रमणिका


- नवजीवन /५
- दुर्दैवी /१२७


✦✦

# नवजीवन

## दोन शब्द

आवडत्या गोष्टीतील ही गोष्ट. महान साहित्यिक महर्षी टॉलस्टॉय यांच्या जगप्रसिध्द 'रिसरेक्शन' या कादंबरीची ही गोष्ट. ही गोष्ट मी अनेक ठिकाणी मुलांना-तरुणांना सांगितली आहे. टॉलस्टॉय म्हणायचे, 'माझी सारी पुस्तके फुकट. रिसरेक्शन खरे.' इतके त्यांना हे आवडे. साऱ्या समाजाचे येथे आंतर्बाह्य दर्शन आहे. समाजातील दंभ, खोटेपणा यांचे येथे विदारक दर्शन आहे. सरकार ही संस्था कशी यांत्रिक असते ते उत्कृष्टपणे येथे मांडले आहे. जगातील विषमता जावी म्हणून क्रांतिकारकांच्या धडपडी येथे दाखवल्या आहेत. ज्यांना आपण गुन्हेगार म्हणतो ते गुन्हेगार नसून समाजरचनाच कशी जबाबदार आहे ते येथे जळजळीतपणे मांडले आहे. या कादंबरीतील उत्कटता, भव्यता मी लहानसा प्राणी या छोट्या गोष्टीत कोठून बरे आणू ? तरीही यथामती माझ्या नेहमीच्या पद्धतीनुसार ही गोष्ट मी लिहून काढली आहे. दोन-तीन वर्षांपूर्वीच काही भाग लिहिला होता. तो आज जोडून महर्षी टॉलस्टॉयना प्रणाम करून हे दोन शब्द संपवितो.

शारदाश्रम, बोर्डी
३०-६-४९

**पां. स. साने**
**(साने गुरुजी)**

# १

शहरातून माणसांनी निसर्गाची जवळजवळ हकालपट्टी केलेली असते. जिकडे तिकडे फरसबंदी असते. कोठे झाडमाड उगवू नये, हिरवे गवत दिसू नये असे केलेले असते. दाट वनराजी कोठेच नसते. सर्वत्र तो कारखान्यातील चिमण्यांचा धूर. असे असले तरीही वसंत ऋतूचे वैभव तेथेही प्रभाव पाडल्याशिवाय राहात नाही. किती झाले तरी वसंत तो वसंत.

ती वासंतिक प्रभातवेळा होती. झाडे सुंदर दिसत होती. त्यांच्या त्या नूतन पल्लवांवर रमणीय सूर्यप्रकाश पडला होता. चिमण्या, कबुतरे, नाना पक्षी घरटी तयार करण्यासाठी आनंदाने श्रमत होती. सृष्टीत एक प्रकारचा निष्पाप आनंद भरून राहिला होता. झाडे, फुले, पक्षी, लहान मुले सर्वांनी सभोवती मधुरता पसरली होती. परंतु वयात आलेली माणसे काय करीत होती ? ती एकमेकांना फसवीत होती. छळीत होती. वास्तविक ईश्वराने ही पृथ्वी आनंदासाठी दिली. येथे प्रेम पिकवा, शांतीने, सुसंवादाने नांदा असे जणू प्रभू सांगत आहे. परंतु मनुष्यप्राणी या सृष्टीचे नंदनवन करण्याऐवजी जणू स्मशान करतो. सर्वत्र लूटमार, पिळवणूक, गुलामगिरी यांचेच साम्राज्य दिसते. मनुष्य कधी सुधारणार?

तुरुंगातील लोकांना वसंत ऋतू काय, शरद् ऋतू काय, सारे सारखेच. तेथे तोच छळ, त्याच शिव्या, तीच अखंड मानहानी, त्याच अंधारकोठड्या, तेथे वासंतिक वारा मोकळेपणाने कोठे फिरणार ? ती पाहा अपराधी स्त्री-कैद्यांना ठेवायची जागा. त्या लहान लहान खोल्या ! त्या एका खोलीतील एका स्त्री-कैद्याला खटल्यासाठी आज कोर्टात न्यायचे आहे. दुसरेही दोन आरोपी आहेत. परंतु त्यांना दुसरीकडून नेण्यात यायचे होते.

अंधाऱ्या बोळातून तुरुंगाधिकारी जेथे स्त्री-कैद्यांना ठेवण्यात येत असे तेथे आला. तेथे कोंदट, कुबट हवा होती. घाण येत होती. तो अधिकारी करड्या कठोर आवाजात म्हणाला, 'रूपा, तुला न्यायालयात जायचे आहे. तयार हो. वेळ नको लावू.'

औरत-कोठडीवरची नायकीण तेथे होतीच.

'लवकर आटप. मघापासून सतरांदा सांगितले तरी ऐकेल तर हराम. यांच्या गप्पा कधी संपत नाहीत. लाजही नाही मेलीला. आटप लवकर.' ती गरजली.

त्या कोठडीत दहा-वीस स्त्रिया होत्या. नाना प्रकारच्या गुन्ह्यांसाठी त्यांना शिक्षा झालेल्या होत्या. त्या कोठडीत उवा, डास, ढेकूण यांची साम्राज्यसत्ता होती. त्या कोठडीत पराकाष्ठेची दुर्गंधी होती. त्या फाटक्या चटया, त्या फाटक्या घोंगड्या, सारे ब्रह्मांड त्यात होते. आणि रूपा तेथे होती ! तिने केस जरा नीटनेटके केले. पदर वगैरे जरा नीट घेतला. ती तयार झाली. नायकिणीने कोठडीचा दरवाजा खोलला.

'चल हो बाहेर.' ती ओरडली.

'रूपा, प्रश्न विचारतील तेवढ्यांचीच उत्तरे दे. अधिक बोलू नकोस. जरूरीपेक्षा बोलण्याने आपण अधिकच गुंतून जातो. मी सांगितलेले ध्यानात ठेव, म्हणजे बरेवाईट फारसे व्हायचे नाही.' कोठडीतील एका बाईने सल्ला दिला.

'आता माझे काय व्हायचे राहिले आहे ? वाईटाची पराकाष्ठा झाली आहे. आणखी वाईट दुसरे काय आहे ? मला कशाचीही आता आशा नाही. जीवनातील सारे विष मी पचविले आहे.' रूपा म्हणाली.

'अगं, एखादे वेळेस सुटशील. नाहीतर आहेच जन्माचा तुरुंग.' कोठडीतील ती बाई बोलली.

'पुरे तुमची बोलणी. मोठी आली सल्ला देणारी. बंद कर तोंड. नाहीतर थोबाड फोडीन. हो आत. कोठडी बंद करायची आहे.' ती नायकीण गरजली.

जेलरसाहेब निघाले. रूपाला घेऊन शिपाई निघाले. बोळाच्या दारापर्यंत ती औरत-कोठड्यांची नायकीण त्यांच्याबरोबर गेली. सलाम करून ती परत कोठडीवर देखरेख करायला आली.

तुरुंगाच्या कचेरीतून सारी व्यवस्था झाल्यावर शिपायांच्या पहाऱ्यात रूपा बाहेर पडली. ते हत्यारी शिपाई होते. आपण जबाबदारीने कर्तव्य पार पाडीत आहोत



अशा ऐटीने ते चालले होते. त्या दुर्दैवी स्त्री-कैद्याकडे रस्त्यातून येणारे जाणारे पाहात होते. गाडीवाले, मजूर, हमाल, दुकानदार, कारकून सारे रूपाकडे बघत नि निघून जात. जणू ती प्रदर्शनातील वस्तू होती. होय ! जगाने तिचे प्रदर्शनच मांडले होते. ती खिन्नपणे परंतु गंभीरपणे पावले टाकीत जात होती.

'काहीतरी वाईट कर्म केले असेल, शेण खाल्ले असेल. भोग म्हणावे कर्माची फळे.' तिच्याकडे पाहून कोणी म्हणे. शाळेत जाणाऱ्या मुलामुलींचीही रस्त्यात गर्दी होती. दहा-साडेदहाची ती वेळ होती. रस्ते गजबजलेले होते. हत्यारी पोलीस पाहून मुले जरा दुरूनच बघत. ही डाकीण आहे की काय, जादूटोणा करणारी आहे की काय, असे मुलांच्या मनात येई. आपल्या अंगावर ती धावून तर नाही ना येणार असेही लहान मुलांच्या मनात येई. परंतु पोलीस आहेत, ती गडबड करणार नाही असा विश्वास वाटून ती थांबत. तिच्याकडे बघत. तो पाहा एक शेतकरी. खेड्यातले धान्य घेऊन तो आला होता. ते विकून आलेल्या पैशात दुसरे शहरी पदार्थ घ्यायला तो जात होता. त्याला त्या अभागिनीची कीव आली. त्याने खिशातून एक चवली काढून तिच्या हातावर ठेवली. दुःखी रूपा दुःखाने हसली. ती लाजली. आपली अशी कीव केली जावी याचे तिला दुःख वाटले. तिच्या डोळ्यांत पाणी चमकले; परंतु तिने अश्रू आवरले. काहीतरी ती पुटपुटली नि पुढे चालली. कोणी तिच्याकडे वाकड्या नजरेनेही बघत. जणू तिचे सौंदर्य त्यांना मोह पाडीत होते. तिला त्यामुळे बरे वाटे. तीही त्यांच्याकडे प्रसन्न दृष्टीने पाही. तिच्या तोंडावर आज जरा टवटवी दिसत होती. बाहेरची मोकळी हवा तिला मिळाली. बाहेरचे विशाल जग बऱ्याच दिवसांनी आज पुन्हा तिने पाहिले. तिचं हृदय – कोमेजलेलं हृदय – जरा प्रफुल्लित झाले होते. ते पाहा धान्याचे मोठे दुकान, आणि त्याच्यापुढे किती ही कबुतरे, किती हे पारवे ! त्यांना दाणे टाकण्यात आले होते. माणसांची आबाळ झाली तरी चाले; परंतु पशुपक्ष्यांची होता कामा नये ! रूपा जात होती. एका सुंदर कबुतराला तिचा पाय लागला. फडफड करीत ते उडाले. तिच्या कानापर्यंत ते उडाले. तिच्या डोक्याभोवती फिरून आपल्या पंखांचा तिला वारा घालून ते पुन्हा खाली आले नि दाणे टिपू लागले. त्या कबुतरांकडे पाहून तिच्या तोंडावर स्मित झळकले. परंतु तिला स्वतःच्या स्थितीचे भान आले आणि ते स्मितच लगेच मावळले. ती पुन्हा खिन्न झाली. तिची मुद्रा करुणगंभीर दिसू लागली.

कोण ही रूपा ? काय आहे तिची हकिकत ? तिची आई एक मोलकरीण होती. एका खेडेगावात दोन श्रीमंत बहिणी राहात होत्या. त्यांचे एक मोठे शेत होते. शेतावर दुग्धालय होते. रूपाची आई तेथे कामाला असे. तिचे लग्न झाले नव्हते. परंतु तिला मधून मधून मुले होत. उपजली नाहीत तो ती मरत. तिची अशी पाच मुले मेली आणि सहावी मुलगी ती ही रूपा. ती नक्षत्रासारखी होती. त्या श्रीमंत बहिणींतील एकीने तिला पाळले, पोसले, वाढविले. प्रथम रूपा आईजवळच होती. तिच्या आईचे गाईच्या गोठ्यातच बाळंतपण झाले होते. अंगावर दूध यावे म्हणून त्या श्रीमंत बहिणीने रूपाच्या आईला थोडे पैसे दिले, पोटभर खायला सांगितले. रूपा वाढली. तीन वर्षांची झाली, आणि तिची दुर्दैवी आई देवाघरी गेली. त्या श्रीमंत बहिणींनी रूपाला आपल्या वाड्यात आणले. तेथे ती वाढू लागली. एक बहीण रूपाचे लाड करी, दुसरी बहीण तिला मारहाण करी. एक लिहा-वाचायला शिकवी, इतर कलाकुसरीचे काम शिकवी; दुसरी बहीण तिला झाडलोट करायला, भांडी घासायला, कपडे धुवायला लावी. एक बहीण तिला नटवी, सजवी; दुसरी तिला शिव्या देई. अशा दुहेरी वातावरणात रूपा वाढली. ती आता मोठी झाली. ती घरातील कामे करी. भांडी आरशासारखी स्वच्छ घाशी. देवाची मनापासून भरपूर फुलांनी पूजा करी. लिही, वाची, भरतकाम करी.

गावातील शेतकऱ्यांच्या तरुणांकडून - कामगारांच्या तरुणांकडून - तिला मागणी आली. तिच्या आईचे ते दारिद्र्यातले अनैतिक वर्तन सर्वांना माहीत होते; परंतु रूपा जणू देवता दिसे. तिच्या आईच्या हकिकती विसरून तिला वरायला तयार होते. परंतु गरिबांजवळ लग्न लावायला रूपाचे मन घेईना. तिला त्या श्रीमंत बहिणीकडे सुखाची सवय लागली होती. ऐषआरामी जीवनाची चटक लागली होती. काबाडकष्टाचे, शेण गोळा करण्याचे जीवन आता तिला नको वाटे. ती सर्वांना नकार देई.

ती सोळा वर्षांची झाली. निर्मल, निष्पाप सौंदर्याची ती पुतळी होती. आणि एके दिवशी त्या बहिणीचा तरुण भाचा आला. तो पदवीधर होता. श्रीमंत होता. त्याचे तिच्यावर नि तिचे त्याच्यावर गोड प्रेम जमले. परंतु तो लगेच गेला. जाताना दोघांचे डोळे भरून आले. दोन वर्षांनी तो भाचा पुन्हा आला परंतु पूर्वीचा निर्मळ, निष्पाप तरुण राहिला नव्हता. तो सुखविलासी, भोगी बनला होता. तो लष्करात



मोठा अधिकारी होणार होता आणि लष्करात लायक ठरावे म्हणून सामान्य नीती त्याने कधीच सोडली होती. तो धूम्रपान करी. मद्यपान करी. तो बाहेरख्यालीही होऊ लागला होता. रूपाला त्याने पाहिले. बुभुक्षित डोळ्यांनी पाहिले. त्याने शेवटी तिला मोह पाडला. त्याने तिला भोगले आणि त्याची दोन दिवसांची रजा संपली. जाताना शंभर रुपयांची नोट त्याने तिच्या हातात कोंबली ! पाच महिन्यांनी तिच्या लक्षात आले की, पोटात बाळ वाढत आहे. ती सचिंत झाली. लाज कशी राखायची? तो कोठे गेला ? त्या घरात ती एके दिवशी उद्धटपणाने वागली. तिला हाकलून देण्यात आले. आता त्या बहिणी तिला काय म्हणून ठेवतील ? त्यांच्या भाच्याचे ते पाप त्या काय म्हणून घरात राखतील ? रूपा निघून गेली. ती एका मोठ्या शहरात गेली. तिच्याजवळ ते शंभर रुपये होते. ती कोठे राहणार ? एका पोलीस अंमलदाराकडे ती मोलकरीण म्हणून राहिली; परंतु पन्नास वर्षांचा तो अंमलदार तिला का सोडील ? तो तिला सतावू लागला. एकदा तर तो फारच रंगात आला. तिने त्याला संतापाने दूर लोटले. 'पाजी, पापी सैतान' म्हणून तिने त्याला लोटले. तो दाणकन् पडला. ती तेथून निघून गेली.

बाळंतपण आता जवळ येत होते. ती जवळच्या एका खेड्यात गेली. तेथे एका सुईणीकडे ती बाळंत झाली. तिचे बाळ आजारी पडले. त्याला दवाखान्यात ठेवण्यात आले. तेथे ते मेले! संपला संसार ! ती पुन्हा शहरात आली. जवळचे सारे पैसे संपले होते. ती बेकार होती. निराधार होती. जंगल खात्यातील एका गार्डकडे ती राहिली. काम करण्यासाठी म्हणून राहिली. तो गार्ड विवाहित होता. तरीही तो रूपाला त्रास देऊ लागला. तो गोडबोल्या होता. कारस्थानी होता, हुशार होता शेवटी त्याने तिच्याशी व्यभिचार केलाच. त्याच्या बायकोनं त्या दोघांना एकान्तात पाहिले. तिने रूपाला बदडले. तिला तेथून हाकलून देण्यात आले. ती आपल्या मामाकडे गेली. तो बुकबाईंडर होता. तो दारुड्या होता. त्याची बायको धोबीकाम करी. रूपा तिला मदत करू लागली. परंतु फारच कष्ट तेथेच पडत. ती रडकुंडीस येई. शेजारी एक विद्यार्थी राहात होता. तो हिला छळू लागला. त्याची आई रूपाला शिव्या देई व म्हणे, 'तू चहाटळ आहेस. तू छिनाल आहेस. तू माझ्या बाळ्याला मोह पाडतेस, तू डोळे मिचकावतेस, थेर करतेस. लाज नाही वाटत ?' ती तेथून गेली. एका ग्रंथकाराने तिच्यावर प्रेम केले; परंतु तिला त्याचा तिटकारा येई. एका दुकानदारावर रूपाचे प्रेम